## लेक लाडकी योजना

या योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील मुलींना त्यांच्या जन्मापासून त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत आर्थिक सहाय्य करणे.



या योजनेअंतर्गत राज्यातील आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबातील मुलींना त्यांच्या जन्मापासून तिचे वय १८ वर्षे पूर्ण होईपर्यंत तिच्या शिक्षणासाठी एकूण ९८,०००/- रुपयांचे आर्थिक सहाय्य ५टप्प्यात करण्यात येते जे तिच्या वयानुसार आणि शिक्षणानुसार वेगवेगळी असेल. लेक लाडकी योजना मुख्य करून मुलींसाठी सुरु करण्यात आलेली एक महत्वाकांक्षी अशी योजना आहे ज्यामुळे आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबात जन्मलेल्या मुली स्वतःचे शिक्षण पूर्ण करून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास करू शकतील.

### लेक माझी लाडकी योजना अंतर्गत दिले जाणारे आर्थिक सहाय्य

| **टप्पा** | | **रक्कम** |
|---|---|---|
| पहिला | मुलीच्या जन्मानंतर | ५,०००/- रुपये |
| दुसरा | मुलगी इयत्ता १ ली मध्ये गेल्यावर | ६,०००/- रुपये |
| तिसरा | मुलगी ६ वी मध्ये गेल्यावर | ७,०००/- रुपये |
| चौथा | मुलगी ११ वी मध्ये गेल्यावर | ८,०००/- रुपये |

| | | |
|---|---|---|
| पाचवा | मुलगी १८ वर्षाची झाल्यावर | ७५,०००/- रुपये |
| | **एकूण लाभ** | **१,०१०००/- रुपये** |

**लेक लाडकी योजना पात्रता व अटी**

- अर्जदार मुलीचे कुटुंब महाराष्ट्र राज्यातील मूळ रहिवाशी असणे आवश्यक आहे.
- फक्त पिवळे आणि केशरी रेशनकार्ड असलेली कुटुंबे लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवू शकतात.
- आर्थिक दृष्ट्या गरीब कुटुंबे या योजनेचा लाभ मिळवू शकतात.
- अर्जदार मुलीने केंद्र किंवा राज्य शासनाच्या इतर योजनेअंतर्गत शिक्षणासाठी आर्थिक सहाय्य घेतलेले असता कामा नये.
- लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी मुलीला स्वतःचे शिक्षण पूर्ण करणे गरजेचे आहे त्यामुळे जर मुलीने एखाद्या कारणास्तव शिक्षण सोडले तर अशा परिस्थितीत तिला लाभाची राशी दिली जाणार नाही.
- अर्जदाराच्या कुटुंबातील कोणी सदस्य सरकारी सेवेत कार्यरत असता कामा नये.
- ही योजना पिवळ्या व केशरी शिधापत्रिकाधारक कुटुंबामध्ये दिनांक १ एप्रिल २०२३ रोजी वा त्यानंतर जन्माला येणाऱ्या एक अथवा दोन मुलींना लागू राहील. तसेच, एक मुलगा व एक मुलगी असल्यास मुलीला लागू राहील.
- पहिल्या अपत्याच्या तिसऱ्या हप्त्यासाठी व दुसऱ्या अपत्याच्या दुसऱ्या हप्त्यासाठी अर्ज सादर करतेवेळी माता/पित्याने कुटुंब नियोजन प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील.
- दुसऱ्या प्रसूतीच्या वेळी जुळी अपत्ये जन्माला आल्यास एक मुलगी किंवा दोन्ही मुलींना या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहील. मात्र

त्यानंतर माता / पित्याने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया करणे आवश्यक राहील.

- लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रक्कम १ लाखापेक्षा जास्त नसावे.

**लेक लाडकी योजनेचा लाभ मिळवण्यासाठी आवश्यक कागदपत्रे**

- मुलीचा जन्माचा दाखला
- कुटुंब प्रमुखांचा उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न १ लाखपेक्षा जास्त नसावे.) याबाबत तहसिलदार / सक्षम अधिकारी यांचा दाखला आवश्यक राहील.
- अर्जदार मुलीचे आधार कार्ड (प्रथम लाभावेळी ही अट शिथील राहील)
- पालकाचे आधार कार्ड
- बँकेच्या पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत
- रेशनकार्ड (पिवळे अथवा केशरी रेशन कार्ड साक्षांकित प्रत)
- पासपोर्ट साईज फोटो
- मतदान ओळखपत्र (शेवटच्या लाभाकरिता १८ वर्ष पूर्ण झाल्यांनतर मुलीचे मतदार यादीत नाव असल्याचा दाखला)
- संबधित टप्प्यावरील लाभाकरिता शिक्षण घेत असल्याबाबतचा संबंधित शाळेचा दाखला (Bonafide)
- कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया प्रमाणपत्र
- अंतिम लाभाकरिता मुलगी अविवाहित असणे आवश्यक राहील, (अविवाहीत असल्याबाबत लाभार्थीचे स्वयं घोषणापत्र)
- मोबाईल नंबर

या योजनेचा लाभ कसा घ्यावा?

१. सदर योजनेसाठी आवश्यक असलेले सर्व अर्ज, राज्यातील प्रत्येक ग्रामीण व नागरी बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, विभागीय उपायुक्त महिला बाल विकास

यांच्या कार्यालयात उपलब्ध असतील. अंगणवाडी सेविका संबंधित लाभार्थ्यांकडून अर्ज भरुन घेतील. गरजेप्रमाणे लाभार्थ्यांस अर्ज भरण्यास मदत केली जाईल आणि सदर अर्ज अंगणवाडी पर्यवेक्षिका / मुख्यसेविका यांच्याकडे सादर करावा.